प्रेस नोट दिनांक ०३/१२/२०१८

| | |
|---|---|
| अेसीबी | रत्नागिरी युनिट |
| आरोपी लोकसेवक | १) श्री. शेखर रुद्राप्पा माळाई, वय ५६ वर्षे, शाखा अभियंता, रत्नागिरी जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग देवरुख.<br>२) श्री. बाळासाहेब धोंडीराम साळवी, वय ५७ वर्षे, उप अभियंता, रत्नागिरी जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग देवरुख. |
| कार्यालय | रत्नागिरी जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग देवरुख. |
| लाच स्विकारल्याचे ठिकाण | देवरुख संगमेश्वर रोडवरील रत्नागिरी जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग देवरुख येथील कार्यालयात. |
| मागितलेली लाचेची रक्कम | ६,०००/- रु. |
| तडजोडीअंती मागितलेली लाच रक्कम | ५,०००/- रु. |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ५,०००/- रु. |
| थोडक्यात हकिगत | यातील तक्रारदार यांनी १४ वा वित्त आयोगाअंतर्गत जुलै २०१८ मध्ये केलेल्या वांझोळे ग्रामपंचायत हद्दीतील बावनदी कोटकरवाडी ते अंगणवाडी बावनदी खुर्द या पाखाडीचे व वाढीव कामाचे रक्कम रुपये १,०४,२६०/- चे बील ग्रामपंचायत वांझोळे, देवरुख ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी यांचे मार्फत जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग देवरुख या कार्यालयात सादर केले होते. सदरचे बील मंजुर करणेकरीता शाखा अभियंता श्री. शेखर रुद्राप्पा माळाई यांनी स्वत: करीता २,०००/- रुपये व उपअभियंता श्री. बाळासाहेब धोंडीराम साळवी यांचेकरीता ४,०००/- रुपये लाचेची मागणी केली होती म्हणुन तक्रारदार यांनी अेसीबी रत्नागिरी कार्यालयाकडे दिनांक ०१/१२/२०१८ रोजी तक्रारी अर्ज दिला होता. सदर तक्रारीच्या अनुषंगाने आज दिनांक ०३/१२/२०१८ रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता तक्रारदार यांनी पाखाडी व वाढीव कामाचे सादर केलेले बील मंजुर करण्याकरीता स्वत:करीता ३,५००/- रुपये व उपअभियंता श्री. साळवी यांचेकरीता १,५००/- रुपये अशी एकुण ५,०००/- रुपये लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम दिनांक ०३/१२/२०१८ रोजी घेवुन येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले. त्याअनुषंगाने आज दिनांक ०३/१२/२०१८ रोजी सापळा आयोजित करुन लोकसेवक श्री. साळवी यांना १,५००/- रुपये व श्री.माळाई यांना ३,५००/- रुपये लाच रक्कम तक्रारदार यांचेकडुन १८.२० वाजता स्विकारल्यानंतर रत्नागिरी जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग देवरुख येथील कार्यालय पंचासमक्ष रंगेहात पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणताही शासकिय अधिकारी/कर्मचारी किंवा त्याचे वतीने खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी कार्यालयाशी खालील क्रमांकावर संपर्क साधावा

**Toll Free No** :- 1064
**Telephone No** :- 02352/222893
**Office email** :- dyspacbratnagiri@mahapolice.gov.in
**Website** :- www.acbmaharastra.gov.in
**Mobile App** :- www.acbmaharastra.net
**Facebook Page** :- www.facebook.com/MaharastraACB

03/12/2018
(राजेंद्र रानमाळे)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,रत्नागिरी

Dy. Supdt. of Anti Corruption Bureau
सत्यमेव जयते
RATNAGIRI